प्रकाशन दिनांक १६-८-२०१७



# आघाड्यांच्या कोलांटउड्या

*महाआघाडीतून विरोधी आघाडीत उडी घेऊन नितीश कुमार यांनी आघाड्यांच्या राजकारणातील उपहास दाखवून दिला आहे.*

राजकारणात कोण कधी कोणाच्या जवळ जातं आणि कोण कोणापासून दुरावतं, याचे संदर्भ सतत बदलत राहतात. जनता दल (संयुक्त), राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस यांच्यात २०१५ साली झालेली 'महाआघाडी' एकाच वेळी राजकीय कुशलतेची आणि आपत्तीची चुणूक दाखवत होती. समाजवादी विचारधारा, इहवादी (सेक्युलर) मूल्यं आणि ग्रामीण भागाला प्राधान्य देणारी विकासविषयक भूमिका ही सूत्रं या आघाडीला सुसंगत ठरवत होती. मुख्य म्हणजे 'मोदी लाटे'च्या वाढत्या संकटाला आळा घालण्यासाठी आणि विखंडित व स्तब्ध विरोधकांना ऊर्जा पुरवण्यासाठी अपरिहार्य व आवश्यक स्वरूपाची ही कृती होती. परंतु त्याच वेळी या आघाडीमधील घटकपक्षांच्या लोकप्रतिमा, त्यांची राजकीय वक्तव्यं व त्यांचा मतदारवर्ग यांच्यात भिन्नता होती आणि प्रसंगी ते परस्परांच्या विरोधीही होते, त्यामुळं ही आघाडी सर्व प्रकारच्या राजकीय तर्कांना सोडून होती. शिवाय, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची बिहारमधील राजकीय उन्नती आणि लोकप्रियता ही जवळपास पूर्णपणे राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांचं कुशासन व भ्रष्टाचार यांच्या विरोधातून आली होती. यामुळं बहुधा मतदारांच्या आणि राजकीय भाष्यकारांच्या मनात गोंधळ निर्माण झाला.

परंतु, कुमार व यादव एकाच आवाजात बोलत होते. आपलं एकत्र येणं ही अतिशय महत्त्वाची घटना असून बिहारला मागासपणातून बाहेर आणण्याचं आणि १९९०च्या दशकाची आठवण करून देणाऱ्या सध्याच्या सांप्रदायिक हिंसक शक्तींना रोखण्याचं काम ही महाआघाडी करेल, असं सांगण्यात आलं. 'सामाजिक न्यायासह विकास' साधण्यावर या आघाडीचा भर असल्याचं दिसत होतं. लालूप्रसाद यादव यांचं राजकीय चातुर्य व जनाधार आणि नितीश कुमार यांची दूरदृष्टी व स्वयंसिद्ध कामगिरी यांच्या एकत्र येण्यामुळं लोकांच्या कल्पनेलाही धुमारे फुटले आणि बिहारच्या चांगल्या भवितव्यासाठी नवीन आशा निर्माण झाली. लालूप्रसाद यादव यांच्या काळातील गुंडगिरीची आठवण शंकासूर करून देत होते, परंतु २०१५च्या राज्य निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षानं (भाजप) चालवलेल्या अतिशय विभाजनवादी व नकारात्मक मोहिमेच्या पार्श्वभूमीवर या महाआघाडीच्या वक्तव्यांवर मतदारांनी विश्वास ठेवला. परंतु बिहारमधील जनतेनं महाआघाडीला मिळवून दिलेला हा ऐतिहासिक विजय २० महिन्यांच्या आत कोलमडला. लालूप्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांवर होणाऱ्या भ्रष्टाचारांच्या आरोपांमुळं तणाव वाढत गेला आणि अखेरीस नाट्यमयरित्या महाआघाडी फुटली. नितीश कुमार राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये (रालोआ) परतल्यामुळं भारतातील सत्ता एकाच राजकीय पक्षाकडं केंद्रीत होण्याची भीती वाढीला लागली आहे.

यादव कुटुंबियांच्या भ्रष्टाचाराच्या वारशापासून

प्रकाशन दिनांक १६-८-२०१७

नितीश कुमार यांनी स्वतःला दूर नेलं असलं तरी त्याहून जास्त राजकीय ताण त्यांनी स्वतःवर ओढवून घेतला आहे. बिहारमधील रालोआच्या आधीच्या सत्ताकाळात (२००५-१४) भाजप हा आघाडीमध्ये दुय्यम स्थानावर होता. परंतु आता मोदी-शाह यांच्या नेतृत्वाखालील भाजप बहुमतात असो वा अल्पमतात, आघाडीतील इतर घटकपक्षांबाबतची त्याची भूमिका अधिक असहिष्णू बनली आहे (उदाहरणार्थ, जम्मू-काश्मीर व महाराष्ट्र). भाजप आणि त्याच्याशी संलग्न इतर सांस्कृतिक संस्था राजकीय यशामुळं अधिक कट्टर बनल्या आहेत.

बिहारमधील ताज्या घडामोडींमुळं भारतीय राजकारणातील आघाड्यांची रचना व टिकाव यासंबंधी प्रश्न उपस्थित होतात. राजकीय आघाड्या संधिसाधूपणे आणि संख्याचलाखीसाठी होतात, हे आता सर्वज्ञात आहे. परंतु भाजपच्या विजयी घोडदौडीमुळं गेल्या दोन वर्षांमध्ये भारतातील आघाड्यांच्या राजकारणाचं स्वरूप बदलत गेलं आहे. सत्तातूर झालेले प्रादेशिक व राष्ट्रीय पक्ष विखंडित मतदानामुळं सरकारस्थापनेमध्ये वर्चस्व मिळावं यासाठी खेचाखेची करत असतं आणि पक्षपाती लाभांसाठी सरकारला वेठीस धरत असत, ते दिवस आता गेले. अस्थिर सरकारं आणि धोरणात्मक अडथळे यांना कंटाळलेले मतदारही सक्षम सरकार व सक्षम नेता या संकल्पनेकडं आकर्षित झाले. प्रादेशिक पक्षांचा मंद गतीनं झालेला ऱ्हास आणि राष्ट्रीय पक्षांचं दृढीकरण यातूनही हे दिसून येतं. काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीविरोधातील भ्रष्टाचाराच्या आरोपांनी भाजपप्रणित रालोआसाठी मार्ग मोकळा करून दिला. या बदलत्या लोकभावनेचा लाभ उठवत भाजपनं प्रचंड बहुमतानं विजय मिळवला. रालोआतील इतर घटकपक्षांना वगळलं तरी भाजपचं एकट्याचं बहुमत सिद्ध होत होतं. तरीही भाजपनं केंद्रात आणि राज्यांमध्येही आघाड्या टिकवून ठेवल्या.

सध्या, भाजप बहुमतात असो वा अल्पमतात असो, मिळालेल्या जागांनुसार तो आघाड्यांमध्ये प्रवेश करतोच. त्यानंतर राजकीय बंड करून बहुमतातील पक्षाला कधी हुसकावून लावतो, तर कधी त्यावर कुरघोडी करतो, आणि अखेरीस सरकार स्थापन करतो (उदाहरणार्थ- गोवा, मणीपूर, अरुणाचल प्रदेश आणि आता बिहार). शक्य तितक्या राज्यांमध्ये शक्य त्या मार्गानं सरकारस्थापनेत सामील होणं, हा भाजपचा हेतू आहे. आत्तापर्यंत २९ राज्यांपैकी १७ राज्यांमध्ये पक्षाचा हा हेतू साध्यही झालेला आहे. किंबहुना, आपल्या धोरणांना असलेला प्रतिकार व मतभिन्नता मवाळ करत नेत आणि हळूहळू पण ठामपणे संघराज्यरचनेला दुबळं करत, अखेरीस सांस्कृतिक व राजकीय एकजिनसीपणाचा व्यापक प्रकल्प साधण्यासाठी भाजपनं आघाड्यांच्या राजकारणाचा साधन म्हणून वापर चालवला आहे. भारतामध्ये कोणत्याही राजकीय पक्षानं संपूर्ण राजकीय-सांस्कृतिक प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इतकी राजकीय स्वहिततत्परता व एकतानता दाखवलेली नाही.

या सर्व घटनाक्रमातून विरोधकांनी कोणता धडा घ्यायला हवा हेही आता पुरेसं स्पष्ट झालेलं आहे. राजकीय संधिसाधूपणा आणि क्लृप्त्या हे मुद्दे सोडून विचार केला, तरी भाजपचं विचारसरणीय आव्हान हे भारतातील इतर कोणत्याही पक्षापेक्षा मोठं आहे. दुबळ्या मनोवृत्तीच्या किंवा नशिबावर भरवसा ठेवून असलेल्या लोकांना हा लढा लढता येणार नाही. भाजपच्या राजकीय चातुर्याचा भेद करण्यासाठी विचारसरणीय स्पष्टता, निर्धार आणि तडफ गरजेची आहे. यातील कोणताच गुण नसलेल्या नितीश कुमारांनी विरोधकांच्या नेतृत्वाची धुरा अंगावर घेतली होती आणि अखेरीस ती धुरा सोडून त्यांनी आघाडीच बदलली. पुढील सार्वत्रिक निवडणुकांना दोन वर्षांहून कमी काळ उरला आहे, अशा वेळी विरोधकांना फारशी आशा वाटण्यासारखी परिस्थिती नाही.

●

# नागालँडमधील राजकीय संगीतखुर्ची

*‘सक्रिय’ राज्यपालांनी हस्तक्षेप करूनही राज्यातील राजकीय नाट्य संपायची चिन्हं नाहीत.*

अनेक असाधारण घटनांनंतर १९ जुलै रोजी नागालँडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ टी. आर. झेलियांग यांनी घेतली आणि आमदारांना खूश ठेवण्याबाबत त्यांनी एक नवीन पायंडा पाडला. राज्याच्या विधानसभेमध्ये २१ जुलैला त्यांनी बहुमत सिद्ध केलं आणि ११ कॅबिनेट मंत्री नियुक्त केले, यातील दोन मंत्री भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) चार आमदारांपैकी आहे. शिवाय, सत्ताधारी नागा पीपल्स फ्रंट (एनपीएफ) या पक्षाला सोडचिठ्ठी दिलेल्या ४७ बंडखोर आमदारांपैकी आणखी ३५ जणांना खूश करण्याचं काम झेलियांग यांना करायचं होतं. त्यानुसार २५ जुलैला त्यांनी यातील २६ आमदारांना संसदीय सचिवांच्या पदांवर घेतलं; ही कॅबिनेट दर्जाची पदं आहेत. उरलेल्या नऊ जणांनाही सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलं; हे पदही कॅबिनेट दर्जाचं आहे. त्यामुळं, ६० सदस्यांच्या सभागृहामधील ज्या ४७ बंडखोर आमदारांनी २१ जुलै रोजी विश्वासदर्शक ठरावादरम्यान झेलियांग यांच्या पारड्यात मतं टाकली, त्या सर्वांना आता कॅबिनेट दर्जाची पदं मिळाली आहेत.

परंतु, झेलियांग यांच्या दुर्दैवानं (आणि योगायोगानं) त्यांच्या निर्णयाला ठेचकळवणारा निर्णय २६ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयानं दुसऱ्या एका खटल्यामध्ये दिला. राज्य विधानसभांमध्ये संसदीय सचिव नियुक्त करण्याची तरतूद लागू करणारा ‘आसाम संसदीय सचिव (नियुक्त्या, पगार, मानधन व संकीर्ण तरतुदी) अधिनियम, २००४’ घटनाबाह्य आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला. झेलियांग यांनी सर्वांना खूश करण्यासाठी आखलेल्या व्यूहरचनेला या निर्णयाचा थेट फटका बसण्याची शक्यता आहे, परंतु त्यांची कुशलता पाहाता ते यातूनही काहीतरी मार्ग शोधतीलच!

झेलियांग यांचा सत्तेपर्यंतचा अलीकडचा प्रवास नाट्यमय आणि वादग्रस्त राहिलेला आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय नियमानुसार स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय त्यांनी घेतल्यावर मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळला, त्यामुळं एनपीएफचे नेते म्हणून झेलियांग यांच्याकडं असलेलं मुख्यमंत्रीपद त्यांना सोडावं लागलं. त्यानंतर एनपीएफनं एकमतानं पक्षाचे ज्येष्ठ नेते शुर्होझेली लेइझेइत्सू (वय ८१) यांना मुख्यमंत्रीपदासाठी उमेदवार जाहीर केलं. या घोषणेवेळी लिएझिएत्सू आमदार नव्हते, त्यामुळं त्यांच्या मुलानं सोडलेल्या मतदारसंघामध्ये २९ जुलै रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीत ते उभे राहिले होते. परंतु त्याआधीच झेलियांग यांनी राजकीय वादळ आणून सत्तेची समीकरणं बदलली.

नागालँडचे राज्यपाल पी. बी. आचार्य यांची (हे पूर्वी भाजपचे ईशान्य भारताविषयीचे सचिव होते.) या सत्ताबदलामधली भूमिकाही तितकीच वादग्रस्त ठरली आहे. शुर्होझेली लिइझेइत्सू यांनी मुख्यमंत्रीपदावर आल्यानंतर आवश्यक बहुमत सिद्ध करेपर्यंत घाईघाईनं आचार्य यांनी झेलियांग यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देऊन टाकली. एनपीएफमधील असहमती हा पक्षांतर्गत मुद्दा आहे, त्याचा विधानसभेशी काही संबंध नाही, असा युक्तिवाद लेइझेइत्सू यांनी केला. सर्वसाधारणपणे, सत्ताधारी पक्षामध्ये औपचारिक फूट पडून घटनात्मक समस्या निर्माण होत नाही तोवर अशा प्रकारचा झगडा सोडवण्याचं काम संबंधित पक्षाच्या अंतर्गत कलह निर्मूलन यंत्रणेवर सोडून द्यायला हवं. विशेष म्हणजे उच्चपदांवर बदल झाला असला आणि झेलियांग सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावेळी पक्षाच्या आदेशाविरोधात मोठ्या प्रमाणावर मतदान झालं असलं तरी एनपीएफमध्ये फूट पडल्याचं मानलं गेलेलं नाही.

झेलियांग यांनी उघडच बंड केल्यावरही लेइझेइत्सू

प्रकाशन दिनांक १६-८-२०१७

यांनी पद सोडायला नकार दिला. त्यावेळी राज्यपालांनी लेइझेइत्सू यांना विधानसभेमध्ये बहुमत सिद्ध करण्यास सांगितलं. पुन्हा लेइझेइत्सू यांनी नकार दिला आणि हा पदबदल म्हणजे एनपीएफचा अंतर्गत प्रश्न आहे असं सांगत राज्यपालांच्या आदेशाला गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या कोहिमा खंडपीठामध्ये आव्हान दिलं. न्यायालयानं असहमती दर्शवत लेइझेइत्सू यांची याचिका फेटाळली. 'या प्रकरणी राज्यपालांनी योग्य विचार करून त्यांच्या आकलनानुसार निर्णय घ्यावा', असा काहीसा गोंधळवणारा निर्वाळा न्यायालयानं दिला. लेइझेइत्सू यांनी त्यांच्या विख्यात विनोदबुद्धीनुसार नंतर अशी टिप्पणी केली की, या प्रकरणात राज्यपालांना योग्य विचार करता आलेला नाही.

नागालँडमध्ये राज्यपालांच्या सोबतीनं भाजपला सत्तेत आणण्याचा निर्धार केलेल्या झेलियांग यांचा 'हेराका बॉय' असा कटू उल्लेखही लेइझेइत्सू यांनी केला. झेलियांग हे झेलियांगरोंग या नागा जमातीमधील आहेत. ही जमात नागालँड, मणीपूर व आसाममध्ये पसरलेली आहे. ख्रिस्ती धर्माचा अगदी शेवटीशेवटी स्वीकार करणाऱ्या जमातींमध्ये झेलियांरोंगही येते. या जमातीपैकी मोठा घटक अजूनही 'हेराका' या ख्रिस्ती धर्माच्या आगमनापूर्वीच्या एतद्देशीय पंथाचं पालन करतो. भारतीय स्वातंत्र्य संघर्षावेळी बंडखोर धार्मिक नेतृत्व दिलेल्या राणी गाइदिनल्यू यांच्यामुळं हेराका पंथ ख्यातकीर्त झाला. गाइदिनल्यू यांनी ब्रिटिश प्रशासनाचा प्रतिकार केलाच, शिवाय नागा सार्वभौमतेसाठी लढणाऱ्या अंगामी फिझो यांच्या नागा नॅशनल कौन्सिललाही त्यांनी विरोध केला. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना गाइदिनल्यू ब्रिटिश तुरुंगात असल्याचं आढळलं, त्यांच्या प्रतिकाराच्या कहाणीनं नेहरू भारावले आणि त्यांनी 'राणी' या संबोधनानं आणि नंतर पद्मभूषण किताबानं गाइदिनल्यू यांचा गौरव केला. मणीपूरमध्ये गाइदिनल्यू यांना आदराचं स्थान असलं तरी नागालँडमध्ये त्यांचं स्मरणालय बांधण्याला तीव्र विरोध करण्यात आला होता. दरम्यान, हेराका पंथीयांना आपल्या बाजूला ओढण्यासाठी भाजप सक्रिय झाल्याचं मानलं जातं आहे

झेलियांग यांच्या सत्तेत परत येण्यासंदर्भातील घटनाक्रमाभोवतीचा वाद संपलेला नाही. पक्षाच्या आदेशाचं पालन न केलेल्या आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी लेइझेइत्सू आणि एनपीएफमधील त्यांचे समर्थक प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नांना यश आलं तर बंडखोर आमदारांना सदस्यत्व कायम राखण्यासाठी विधानसभेतील दुसऱ्या पक्षात प्रवेश करावा लागेल. त्यांच्या सध्याच्या बंडामध्ये भागीदार असलेल्या भाजपमध्ये ते सामील होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. असं झाल्यास एनपीएफचं पाठबळ कमी होईल. याचा पुन्हा भाजपलाच फायदा होईल. ●

हे टिपण प्रदीप फन्जुबम (phanjoubam@gmail.com) यांनी लिहिले आहे. ते 'इम्फाळ फ्री प्रेस' या दैनिकाचे संपादक आहेत.

---

## रणगाड्यांचा राष्ट्रवाद

***भारतीय राष्ट्रवादी कल्पनाविश्व आणि सैन्यदले यांच्या संबंधांमध्ये स्पष्टपणे बदल झाला आहे.***

पूर्वीच्या काळी गोऱ्या माणसांनी भारतीयांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली होती, तसंच विद्यमान भारत सरकारनं भारतीयांना राष्ट्रवादी बनवण्याच्या कामाला स्वतःला जुंपून घेतलं आहे. अर्थातच, आत्तापर्यंत भारतीय पुरेसे राष्ट्रवादी नव्हते असं यात गृहीत धरण्यात आलं आहे. ही मोहीम फत्ते करण्यासाठी सैन्यदलांविषयी आदरभाव आणि भीती रुजवण्याची पद्धत अवलंबली जात आहे. 'लोकांनी आम्हाला घाबरायलाच हवं', असं जाहीर वक्तव्यच विद्यमान लष्करप्रमुख बिपीन रावत यांनी केलं होतं.

भारतीय राष्ट्रवादी कल्पनाविश्व आणि सैन्यदलं यांच्यातील संबंधांमध्ये स्पष्ट बदल घडवणारा हा घटनाक्रम आहे. सैनिक हा लोकांचा सेवक असतो, राष्ट्राच्या संरक्षणासाठी लोकांच्या पैशातून त्याला पगार दिला जातो, ही प्रतिमा बदलून नागरिकांना राष्ट्रवादाचे धडे देणाऱ्या शिक्षकाची भूमिका सैन्याकडं देण्यात आली आहे.

सैनिकी भक्तिभावाचा आणखी एक दाखला अलीकडंच जवाहरलाल नेहरू विद्यापिठाचे कुलगुरू एम. जगदेश कुमार यांच्या रूपात मिळाला आहे. विद्यापिठाच्या आवारामध्ये भारतीय सैन्याचा रणगाडा प्रदर्शनी स्थळी ठेवावा, अशी विनंती कुमार यांनी केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवादी भावना रुजाव्यात आणि 'भारतीय सैन्याचा महान त्याग व शौर्य' यांची आठवण विद्यार्थ्यांना 'सतत' होत राहावी, यासाठी ही योजना त्यांनी आखली आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापिठात पहिल्यांदाच कारगील विजय दिवस साजरा करण्यात आला, त्यावेळी उपस्थित असलेले केंद्रीय मंत्री व्ही. के. सिंग आणि धर्मेंद्र प्रधान यांना कुमार यांनी सदर विनंती केली. 'राष्ट्रद्रोही' विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्त बनवण्यासाठी मांडलेल्या इतर कुशल सूत्रांना धरून त्यांनी हा प्रस्तावही समोर ठेवला. सर्व केंद्रीय विद्यापिठांमध्ये राष्ट्रध्वज लावण्याची सूचना वर्षभरापूर्वी माजी मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी केली होती. असा एक ध्वज जवाहरलाल नेहरू विद्यापिठात आधीपासूनच फडकतो आहे, हे इराणी यांच्या नंतर लक्षात आलं. मग निराश झालेल्या इराणींनी आणखी एक कल्पना मांडली. विद्यार्थ्यांसमोर राष्ट्रवादाविषयी व्याख्यान देण्यासाठी सेनाधिकाऱ्यांना निमंत्रित करावं, अशी त्यांची योजना होती. पण नंतर सुदैवानं त्यांना कापडोद्योगावर लक्ष केंद्रीत करण्यास सांगण्यात आलं. विद्यापिठाचं काम नक्की काय असतं, याची फारशी समज सध्याच्या सरकारला आहे, असं दिसत नाही. परंतु, सैनिकांना अलौकिकत्व देण्याचा या संदर्भातील दृष्टिकोन धोकादायक आहे. अशीच भूमिका कायम राहिली, तर त्यातून लोकशाही संस्थांनाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

सैनिकाची प्रतिमा देशभक्तीचं रूपक म्हणून वापरण्याची पद्धत नवीन नाही. परंतु, भारतीय राष्ट्रवादाचं मूळ वसाहतवादविरोधात आहे, त्यामुळं वासाहतिक सत्ताधाऱ्यांचा वारसा असलेल्या सैन्यदलांसोबतचं या राष्ट्रवादाचं नातं अस्वस्थ स्वरूपाचंच राहिलं. किंबहुना, स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये सैन्याला काटेकोर नागरी नियंत्रणाखाली असलेली शुद्ध व्यावसायिक दलं मानलं जात होतं. खादी घातलेला सत्याग्रही अथवा मृत्यूची तमा न बाळगणारा क्रांतिकारी, हे आदर्श राष्ट्रवादी मानले जात होते. आज ही आदर्श राष्ट्रवाद्याची जागा सैनिकाच्या प्रतिमेनं घेतली आहे.

माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी १९६५च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी 'जय जवान, जय किसान' ही घोषणा रूढ केली. १९६२च्या भारत-चीन युद्धातील पराभवामुळं मनोबळ खच्ची झालेल्या सैनिकांना प्रेरणा देण्यासाठी ही घोषणा करण्यात आली होती. परंतु, या घोषणेत राष्ट्राचे आदर्श सेवक म्हणून सैनिकांना शेतकऱ्यांच्या बरोबरीचं स्थान देण्यात आलं होतं. त्यानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात या घोषणेचा विस्तार 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' असा झाला, त्याच दरम्यान भारतीय राष्ट्रवाद आणि अतिरिक्त सैनिकीकरण हे समानार्थी शब्दप्रयोग बनले होते. पोखरणमध्ये १९९८ साली करण्यात आलेल्या आण्विक चाचणीचा संदर्भही या घडामोडींना होता. या वेळी भारत हा परिपूर्ण अण्वस्त्रक्षम देश बनल्याची निडर घोषणा करण्यात आली. या दोन घोषणांच्या दरम्यान १९७१ साली एक युद्ध होऊन गेलं होतं आणि पहिली आण्विक चाचणीही १९७४ साली होऊन गेली होती. परंतु, शांतता व निःशस्त्रीकरणासंदर्भातील भारताचं पोकळ बांधिलकीचं ढोंगही १९९०च्या दशकाच्या शेवटाकडं सोडून देण्यात

प्रकाशन दिनांक १६-८-२०१७

आलं. साहजिकपणे १९९९च्या कारगील युद्धाची आठवण ठेवताना रणगाड्यांचा वापर अध्यापकीय साधनासारखा करण्यात आला आहे.

आजच्या घडीला, सैनिकी व्यक्तिमत्वांना आदर्श राष्ट्रवादी म्हणून गौरवलं जात असतानाच सैन्यदलांमधील राजकीय हस्तक्षेपही वाढला आहे. विद्यमान लष्करप्रमुख बिपीन रावत यांची नियुक्ती करताना दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना वगळण्यात आलं. राजकीय पक्षपातीनुसार दिल्या जाणाऱ्या बढत्या, ही नवीन बाब नसली (इंदिरा गांधींच्या काळी याच पदावर अरुण वैद्य यांची नियुक्ती झाल्याची आठवण इथं नोंदवता येईल), तरी सध्याच्या लष्करप्रमुखांना जाहीररित्या अनिर्बंधपणे घोषणा करण्याची मुभा मिळणं निश्चितपणे अपवादात्मक आहे. उदाहरणार्थ, काश्मीरमध्ये मानवी संरक्षणकवच वापरलं गेल्याचं समर्थन करणारी विधान रावत यांनी करूनही त्यावर कोणतीही टीका झाली नाही. किंबहुना सार्वजनिक टीकेनं राष्ट्रद्रोहाचे प्रतिआरोपच वाढले आहेत.

उत्तर बंगाल विद्यापिठाच्या आवारामध्ये ४०हून अधिक वर्षांपासून रणगाडा प्रदर्शनीय ठिकाणी आहे. परंतु, तिथली प्रतिकात्मकता पूर्णपणे निराळ्या धर्तीची आहे. तो रणगाडा भारतीय सैन्यानं बांग्लादेश मुक्ती युद्धावेळी ताब्यात घेतलेला आहे. बाह्य शत्रूविरोधातील भारतीय सैन्याचा विजय साजरा करणारं ते प्रतीक आहे. परंतु, जवाहरलाल नेहरू विद्यापिठाच्या कुलगुरूंनी आवारात रणगाडा बसवण्याची मागणी करण्यामागचे संदर्भ निराळे आहेत. हे विद्यापीठ म्हणजे राष्ट्रद्रोह्यांचा बालेकिल्ला आहे, अशी दर्पोक्ती स्वघोषित राष्ट्रवादी करत असताना कुलगुरूंनी ही मागणी केली आहे. कारगील युद्धाचं स्मरण करणाऱ्या ज्या कार्यक्रमात कुलगुरूंनी ही मागणी केली, त्यावेळी इतर सन्माननीय पाहुण्यांनी केलेल्या वक्तव्यांमधून हे संदर्भ आणखीच स्पष्ट होतात. सैन्याला प्रश्न विचारण्याचा अधिकार नागरिकांना नाही, असं माजी क्रिकेटपटू गौतम गंभीरनं जाहीरच केलं. हा कार्यक्रम म्हणजे 'केवळ बाह्य युद्धात कारगील परत मिळवल्याचं स्मरण करणारा समारंभ नसून अंतर्गत युद्धामध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठ ताब्यात घेतल्याचाही हा समारंभ आहे', असं लेखक राजीव मल्होत्रा म्हणाले. केवळ जवाहरलाल नेहरू विद्यापिठावर ताबा मिळवून थांबता येणार नाही, तर जादवपूर विद्यापीठ आणि हैदराबाद केंद्रीय विद्यापीठ या 'बालेकिल्ल्यां'वरही हल्ला करायला हवा, अशी घोषणा निवृत्त सेनाधिकारी जी. डी. बक्षी यांनी यावेळी केली. कुलगुरूंच्या उपस्थितीत एका सार्वजनिक समारंभात करण्यात आलेली ही विधानं आहेत. सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या काळात सैनिकीकरणाचा उत्सव करून त्याला राष्ट्रवादाची सर्वोच्च अभिव्यक्ती म्हणून सादर करण्याची पद्धत आता रूढच झाल्याची ही चिन्हं आहेत. ●

---

## न्यायाच्या नावाखाली

*भारतीय कुटुंबव्यवस्थेला 'वाचवण्या'ऐवजी न्यायालयांनी मोडकळीला आलेल्या न्यायव्यवस्थेवर उपाय करायला हवेत.*

सर्वोच्च न्यायालयानं भारतीय महिलांची बाजू घेतली नाही. उलट, संकटात सापडल्यावरही न्यायालयात जावं की नाही याचा महिला आता दोनदोनदा विचार करतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतीय दंडविधानातील 'कलम ४९८-ए'मधील तरतुदी सर्वोच्च न्यायालयानं २७ जुलैच्या निकालापत्राद्वारे आणखी दुबळ्या केल्या आहेत. हुंडा व तत्सम मागण्यांपायी तरुण महिलांना सहन करावा अत्याचार आणि प्रसंगी त्यांना येणारा मृत्यू यांना प्रतिबंध करण्यासाठी 'हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१'मधील तरतुदी पुरेशा

सक्षम नाहीत, असं वाटल्यानं १९८३ साली 'कलम ४९८-ए' लागू करण्यात आलं होतं. परंतु, या तरतुदीचा 'गैरवापर' होतो, असा आरोप करणाऱ्या 'सेव्ह इंडियन फॅमिली'सारख्या गटांचा युक्तिवाद न्यायालयानं मान्य केल्याचं दुर्दैवानं दिसतं आहे. एखाद्या महिलेला तिच्या तक्रारासाठी आवश्यक पुरावा देता आला नाही की अशा प्रकरणांना 'बनावट' ठरवून त्याची प्रसिद्धी करणारे हे गट आहेत.

'राजेश शर्मा अँड ओआरएस विरुद्ध स्टेट ऑफ उत्तर प्रदेश अँड एएनआर' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं 'कलम ४९८-ए'च्या सकृत्-दर्शनी 'गैरवापरा'वर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला आहे. या कलमांतर्गत नोंदवल्या जाणाऱ्या तक्रारींपैकी केवळ १४.४ टक्के प्रकरणांमध्ये आरोपींना दोषी ठरवणारा निकाल दिला जातो, असं २०१२ सालच्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीत म्हटलं होतं. (इतर गुन्ह्यांमध्ये आरोपींना दोषी ठरवलं जाणाऱ्या निकालांची टक्केवारी पाहाता, हा दर अजिबातच असाधारण नाही). या आकडेवारीकडं पाहाता या संदर्भात दाखल होणाऱ्या तक्रारी 'बनावट' असल्याचं सूचित होतं, असा निष्कर्ष न्यायालयानं काढलेला दिसतो. यावर उपाय म्हणून न्यायालयानं सर्व राज्यांना जिल्हा पातळीवर तीन सदस्यीय कुटुंबकल्याण समिती स्थापन करण्याचा आदेश दिला. 'कलम ४९८-ए' अंतर्गत आपल्या कुटुंबातील सदस्यांविरोधात गुन्हेगारी तक्रार दाखल करायची असलेल्या कोणत्याही महिलेनं पहिल्यांदा या समितीशी संपर्क साधणं अपेक्षित आहे. 'नागरी समाजा'च्या या समितीमध्ये 'निमकायदेशीर स्वयंसेवक/ सामाजिक कार्यकर्ते/ निवृत्त व्यक्ती/ सक्रिय अधिकाऱ्यांच्या पत्नी/ इतर नागरिक' यांचा समावेश असेल. ही समिती पहिल्यांदा तक्रारीची पाहणी करेल, आणि एक महिन्यामध्ये पोलीसांना अहवाल सादर करेल, त्यानंतरच पोलीसांना कार्यवाही करता येईल. परंतु, तक्रारदार महिलेचं दरम्यानच्या काळात काय होईल, याचा विचार न्यायालयानं केलेला दिसत नाही. घरातील हिंसाचारापासून सुटका करून घेण्यासाठी तिनं कुठं जावं? शिवाय, ही 'नागरी समाजा'ची समिती पूर्वग्रहविरहित असेल, तिला लाच दिली जाणार नाही किंवा गुन्हेगारांच्या बाजूनं निकाल देण्यासाठी तिच्यावर दबाव येणार नाही, असं आपल्याला मानता येईल का? सहा महिन्यांनंतर संबंधित प्रकरणाचं पूनर्मूल्यांकन करावं, असं न्यायालयानं म्हटलं असलं तरी या आदेशामागील मूळ गृहितकच गैर आहे; कारण, महिलांच्या तक्रारी प्रामाणिक नसतात आणि त्यावर वाढीव चाळणीची गरज आहे, असं मानून हा आदेश दिलेला दिसतो.

विवाहानंतर सुरुवातीच्या वर्षांमध्ये महिलांविरोधात होणारा हिंसाचार अनेकदा हुंड्याच्या मागणीसंदर्भात असतो. हुंडा प्रतिबंधक अधिनियम अस्तित्वात असला, तरी हुंडा देण्या-घेण्याची पद्धत संपुष्टात आलेली नाही. किंबहुना, उपभोक्तावादी अर्थव्यवस्थेच्या वाढीसोबत ही रुढी वाढलीच आहे. हुंड्याच्या मागणीवरून आत्महत्या करणाऱ्या अथवा मारल्या जाणाऱ्या तरुण महिलांसंबंधीच्या निराशाजनक बातम्या नियमितपणे येत असतात, यावरून हे सिद्ध होतं. मुख्यत्वे या समस्येवर उपाय करण्यासाठी १९८३ साली 'कलम ४९८-ए' लागू करण्यात आलं. 'अशा महिलेशी क्रूर वागणूक करणारा पती अथवा पतीचे नातेवाईक यांना कमाल तीन वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा आणि दंडही ठोठवावा', असं या कलमामध्ये म्हटलं आहे.

तक्रारदार महिलेच्या कुटुंबसदस्यांना अटक करण्याचे अधिकार पोलीसांना दिल्यामुळं हे कलम वादग्रस्त ठरलं आहे. अनेक प्रसंगांमध्ये पती, त्याचे पालक आणि त्याच्या भावंडांवरही आरोप करण्यात येतात, त्यामुळं त्यांनाही अटक केली जाते. परंतु या अधिकारांवर चाप ठेवण्यासाठी एक आदेश सर्वोच्च न्यायालयानं यापूर्वीच दिलेला आहे. 'कलम ४९८-ए'चा वापर करून अटक करण्याच्या पोलीसांच्या

अधिकारांवर बंधनं आणणारी मार्गदर्शक तत्त्वं २०१४ सालच्या एका खटल्यात न्यायालयानं घालून दिली होती. या कलमामुळं मिळालेले अधिकार म्हणजे 'पोलीसांसाठी भ्रष्टाचाराचा एक लाभदायक स्रोत आहे', असं न्यायालयानं त्या वेळी नोंदवलं होतं. भारतीय दंडविधानाच्या इतर अनेक तरतुदींमध्ये याचा वापर ज्या पद्धतीनं होतो ते पाहाता न्यायालयाचं हे निरीक्षण अचूक होतं. पोलीसांना न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर समाधानकारक स्पष्टीकरण देता येणार असेल तरच '४९८-ए' अंतर्गत अटक करता येईल, असं न्यायालयानं म्हटलं होतं. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालानंतर केंद्रीय गृह मंत्रालयानं एक सूचनापत्रक सर्व राज्य सरकारांना पाठवलं. '४९८-ए' सारखी कलमं 'बचाव म्हणून वापरली जाण्याऐवजी असमाधानी पत्नींकडून अस्त्र म्हणून वापरली जात आहेत', असा उल्लेख सरकारनं या सूचनापत्रकात केला होता. अनेक शंकांना जागा करून देणारी ही शब्दयोजना होती. या तरतुदीची धारच काढून टाकण्याच्या दिशेनं पावलं टाकली जातील, ही शंका आता खरी ठरली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाद्वारे ते साधण्यात आलं आहे.

हिंसाचाराला सामोरं जाणाऱ्या पीडित महिलांना न्याय देताना खरं आव्हान कायद्यातील त्रुटींचं नसून मोडकळीला आलेली गुन्हेगारी न्यायव्यवस्था हे आव्हान आहे. बलात्कार असो वा हुंडा, पोलीसांकडं दाद मागण्यासाठी गेलेल्या महिलांना वारंवार नकारात्मक वागणूक दिली जाते. गुन्ह्याचा तपास कार्यक्षमतेनं केला जात नाही, न्यायालयात सरकारी पक्षाकडून ठोस युक्तिवाद केले जात नाहीत, यांमुळं बहुतांश प्रकरणांमध्ये गुन्हा सिद्ध होण्याची शक्यताच मंदावत जाते. त्यामुळं, अनेक महिला साहजिकपणे निराश होऊन जातात. ज्या महिला धाडस दाखवून तक्रार दाखल करतात, त्यांना 'बनावट' तक्रार केल्याचा आरोप सहन करावा लागतो किंवा '४९८-ए'अंतर्गत येणाऱ्या खटल्यांमध्ये कुटुंबाला 'वाचवण्या'साठी तडजोड करण्याची सक्ती या महिलांवर केली जाते. 'भारतीय कुटुंबव्यवस्थे'च्या दंतकथेला 'वाचवण्या'ची काहीही गरज नाही. उलट, या कुटुंबव्यवस्थेपासून आणि महिलांच्या हिताविरोधात कार्यरत असलेल्या न्यायव्यवस्थेपासून महिलांनाच वाचवण्याची गरज आहे.. ●

---

## पूर व्यवस्थापन

*वार्षिक पूरस्थितीचा सामना करणाऱ्या प्रदेशांमध्ये आपत्ती व्यवस्थापनापलीकडे उपाययोजनांची गरज.*

आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीला येणारा पूर ही दरवर्षीची एक नैसर्गिक घटना असली, तरी या पूरस्थितीला दिला जाणारा सरकारी प्रतिसाद अजिबातच नैसर्गिक नाही. या वर्षी ब्रह्मपुत्रेच्या पुरामुळं आत्तापर्यंत ७७ जणांचा मृत्यू झाला आहे तर सुमारे १२ लाख लोक विस्थापित झाले आहेत, असं सरकारी आकडेवारी सांगते. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या १० जुलै रोजीच्या अहवालानुसार, २० जिल्ह्यातील २,०५३हून अधिक गावं आणि सुमारे एक लाख हेक्टर शेतजमिनीमध्ये पुराचं पाणी गेलं आहे. नैसर्गिक आपत्तीमुळं घडलेला आणि मानवी हस्तक्षेपांनी आणखी उग्र केलेला हा विध्वंस आहे, या पार्श्वभूमीवर पुरापासून संरक्षण करण्यावरील आपलं लक्ष आता पुराच्या व्यवस्थापनाकडं वळवणं गरजेचं आहे.

टोकाच्या हवामानविषयक घडामोडींमुळं सध्या गुजरात व राजस्थान इथंही पूर उद्भवलेले आहेत, परंतु आसाम आणि अगदी बिहारमध्येही येणारे पूर

यापेक्षा भिन्न स्वरूपाचे असतात. यातील पहिल्या प्रकारच्या पुरांवर तातडीनं सुटका व दिलासा कार्य गरजेचं असतं, तर दुसऱ्या प्रकारच्या पुरांसाठी रचनात्मक हस्तक्षेप, संस्थात्मक सुधारणा आणि नदीतीरावरील लोकसंख्येची लवचीकता वाढवण्यासाठी सर्वांगीण पावलं उचलणं गरजेचं असतं. उत्तर प्रदेशच्या पूर्व भागातील महाराजगंजपासून ते आसाममधील बराक खोऱ्यातील करीमगंज इथपर्यंतचा गाळाच्या जमिनीचा मोठा पट्टा वेळोवेळी विविध प्रकारच्या जलसंकटांना सामोरं जात असतो. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम या राज्यांमध्ये पसरलेल्या या भूपट्ट्यावर लोकसंख्येची दाटीही जास्त आहे. भारताच्या एकूण भौगोलिक प्रदेशापैकी १७ टक्के प्रदेश या चार राज्यांमध्ये आहे, आणि देशातील सर्व पूरग्रस्त प्रदेशांपैकी ४३ टक्के - ५२ टक्के भाग या राज्यांमध्ये येतो.

सातत्यानं येणारे पूर हे नैसर्गिक घटित असलं, तरी मानवी हस्तक्षेपांचाही परिणाम त्यावर होत असतो. गंगा व ब्रह्मपुत्रेच्या बहुतांश उपनद्यांचं पाणलोट क्षेत्र असलेल्या हिमालयात पर्जन्यमान जास्त असतं आणि तिथं समुद्रसपाटीपासूनची उंचीही जास्त असल्यामुळं पावसाचं पाणी पूर्व हिमालयातून नदीप्रवाहांमधून पूरप्रदेशापर्यंत उग्रपणे वाहात जातं. परिणामी, नदीप्रवाहाची पाणी वाहून नेण्याची क्षमता ओलांडली जाते आणि बाजूच्या प्रदेशात पाणी घुसतं. पण याच बरोबर पूर्व हिमालयात वाढलेली वृक्षतोड जमिनीवरील पाण्याची व्याप्ती आणि प्रवाहाचा वेग वाढवण्याला कारणीभूत ठरली आहे. यामुळं मैदानी प्रदेशात नदी प्रवेश करते तोपर्यंत नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ जमा झालेला असतो. यातून नदीची प्रवाहक्षमता आणखी कमी होते आणि पुराचा धोका वाढतो. नदीच्या वरच्या बाजूला- मुख्यत्वे अरुणाचल प्रदेशामध्ये- मोठी धरणं बांधायची योजना विचाराधीन आहे, परंतु अशा धरणांमुळं नदीची प्रवाहक्षमता कमी करणारी प्रक्रिया अधिक वेगवान होईल.

ऐतिहासिकदृष्ट्या पुरापासून संरक्षण करण्यासाठी बंधारे बांधण्याचा उपाय सर्वोत्कृष्ट मानला गेला आहे. सिंचनविषयक प्रशासकीय कामकाजामध्ये कालव्यांचं जे होतं तोच प्रकार बंधाऱ्यांच्या बाबतीतही होतो. हे दोन्ही खर्चिक रचनात्मक हस्तक्षेप आहेत. कालव्यांद्वारे उंचसखल प्रदेशांमध्ये पाणी वळवलं जातं, तर बंधाऱ्यांद्वारे पुराच्या पाण्याला थोपवलं जातं. परंतु या दोन्ही प्रकारच्या उपायांची पूर्ण क्षमतेनं अंमलबजावणी झालेली नाही. कालव्यांच्या व्यवस्थापनाविषयी मोठ्या प्रमाणात सखोल लेखन झालेलं आहे, परंतु बंधाऱ्यांच्या व्यवस्थापनाविषयीचा अभ्यास बराचसा काठाकाठावरच राहिलेला आहे. निवाऱ्यासाठी 'सुरक्षित' प्रदेश तयार करण्यासाठी बंधारे बांधले जातात आणि नव्यानं बंधारे बांधले जात असलेल्या प्रदेशांमध्येच हे केलं जातं. परंतु बंधाऱ्यांचा बऱ्यापैकी दीर्घ इतिहास लाभलेल्या उत्तर बिहार आणि आसाम यांसारख्या प्रदेशांमधील परिस्थिती गुंतागुंतीची आहे. मोठ्या प्रमाणावर लोक बंधाराक्षेत्राच्या आत, म्हणजे 'सुरक्षित' प्रदेशाच्या कक्षेबाहेर राहातात. त्यामुळं त्यांना पुराचा मोठा धोका असतो. दुर्दैवानं 'सुरक्षित' प्रदेशामध्ये राहाणाऱ्या लोकांनाही सातत्यानं बंधारा फुटण्याची भीती सतावत असते. त्यांची भीती पूर्णपणे अनाठायीही नसते- या वर्षी आसाममध्ये आलेला पूर आणि २००८ साली कोसी नदीला आलेला पूर बंधारा फुटल्यानं आला होता. शिवाय, बंधाराक्षेत्रामध्ये राहाणाऱ्या लोकांना अचानक येणारा पूर किंवा धीम्या गतीनं येणारा पूर यांचा धोका असतो. उत्तराखंडमध्ये २०१३ साली आलेला पूर धरणसाठ्यातून नदीपात्रात अचानक मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळं आला होता.

पूरस्थितीला प्रतिसाद देताना सरकार मुख्यत्वे धरणांसारख्या महाकाय रचना उभारणं, नद्यांमधील गाळ उपसणं आणि झीज रोखण्यासाठी काट्याकुट्याची कुंपणं बांधणं यांसारख्या उपायांवर लक्ष केंद्रीत करतं.

परंतु धरणांमध्ये थोड्याच काळात गाळ साचतो, खासकरून पूर्व हिमालयात हे अधिक वेगानं घडतं, हे व्यवहारातील अनुभवावरून सिद्ध झालेलं आहे. धरणाचा बचाव करण्यासाठी पाणी नदीमध्ये सोडावं लागतं, त्यामुळं पूर येतो. आसामच्या वरच्या व खालच्या विविध जिल्ह्यांमध्ये वर्षानुवर्षं हे घडत आलेलं आहे. नदीपात्राची झीज रोखण्यासाठी उभारलेली बांबूची कुंपणं अनेकदा कमअस्सल दर्जाची असल्याचं दिसून आलं आहे. पुराच्या पाण्यात ती वाहूनच जातात.

या मूळ दृष्टिकोनातच बदल गरजेचा आहे. पूर हे नैसर्गिक घटित असल्याचं मान्य करून पूरसंरक्षणापासून चर्चेचा झोत पूरव्यवस्थापनाकडं वळवणं आवश्यक आहे. पुरापासून संरक्षणाचे उपाय मूलतः रचनात्मक हस्तक्षेप आणि दिलासाकार्य इथंच घोटाळत राहातात. पूर व्यवस्थापनासाठी विविध पातळ्यांवर नवशोधक दृष्टीनं उपक्रम राबवावे लागतील. एका पातळीवर, पूर्व हिमालयातील स्वच्छ पर्यावरणाच्या प्रदेशांमधील सर्व विकासकामांची 'व्यूहात्मक पर्यावरणीय चाचणी' घेणं महत्त्वाचं ठरेल आणि त्यानुसार नदीपात्राचं व्यवस्थापन करता येईल. यात काही रचनात्मक हस्तक्षेपांचा समावेश असू शकतो. संस्थात्मक पातळीवर, आसाममधील मृतःप्राय ब्रह्मपुत्रा मंडळाचं सक्षमीकरण करणं आणि विविध अभ्यासशाखांमधील वैज्ञानिकांना या मंडळात सहभागी करून घेणं गरजेचं आहे. यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा पूरग्रस्त प्रदेशातील लोकांच्या लवचिकतेशी संबंधित आहे. दुर्बलता कमी करणं, पूरग्रस्त लोकांना ज्या विकाससेवांपासून वंचित राहावं लागतं त्या सेवांची उपलब्धतता वाढवणं, आणि लोकस्रोतांचा योग्य वापर करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणं– या तीन खांबांवर आधारित हस्तक्षेप करून नदीकाठावरील लोकांची लवचिकता वाढवण्यासाठी सर्वांगीण योजना आखणं, हे सर्वांत महत्त्वाचं पाऊल ठरेल. ●

---

## मृत्यूचा श्वास

***विशिष्ट व्यवसायांशी संबंधित सिलिकॉसिससारख्या आजारांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष होत आलं आहे.***

सिलिकॉसिस हा मूकपणे मृत्यूच्या दारात नेणारा आजार आहे. भारतातील सुमारे तीस लाख ते एक कोटी कामगारांना याची लागण झालेली आहे. तरीही या आजाराकडं आवश्यक तितकं लक्ष दिलं जात नाही. अलीकडंच ओडिशामधील कामगार न्यायालयानं या संदर्भातील एका खटल्यात केओन्झार जिल्ह्यामधील मदरंगजोडी गावातल्या १६ कुटुंबांना नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. सिलिकॉसिसमुळं या कुटुंबांमधील मुख्य कमावत्या व्यक्तींनाच प्राण गमवावा लागला होता. या सर्व व्यक्ती पायरोफिलाइटची पावडर करणाऱ्या कारखान्यात काम करत होत्या. अनियंत्रित आणि हानिकारक खाणकाम व उद्योगक्षेत्राची काळी बाजू या निर्णयानं उजेडात आणली आहे. कामाच्या प्रक्रियेदरम्यान श्वसनाद्वारे या कामगारांच्या फुफ्फुसांमध्ये गारगोटीची धूळ आत जात होती. कालांतरानं त्यांची फुफ्फुसं निष्क्रिय झाली आणि हे १६ जण मरण पावले. त्यांना झालेल्या सिलिकॉसिस आजारावर उपचार नाहीत. आता या मृत कामगारांच्या मागं 'विधवांचं गाव' उरलं आहे. एका स्थानिक संस्थेनं राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडं दाद मागितल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. हे कामगार सिलिकॉसिसनंच मृत्युमुखी पडल्याचं सिद्ध झालं. ते जिथं काम करत होते त्या कारखान्यामध्ये सुरक्षेसाठी आवश्यक प्रतिबंधात्मक साधनसामग्री पुरवण्यात आली असती आणि गारगोटीची धूळ कमी उत्पन्न करणाऱ्या प्रक्रियांचा वापर झाला असता तर या कामगारांचा मृत्यू ओढवला नसता. ओडिशा सरकारनं पीडित कुटुंबांना ४६ लाख रुपयांची भरपाई द्यावी, असे आदेश

न्यायालयानं दिले आहेत.

यापूर्वी, गुजरातमधील गोध्रा आणि बलासीनोर इथं काचमणी फोडण्याच्या कारखान्यांमध्ये दहा वर्षांहून अधिक काळ काम केल्यानंतर सिलिकॉसिसमुळं मरण पावलेल्या २३८ कामगारांशी संबंधित खटल्यात सर्वोच्च न्यायालयानंही कामगारांच्या बाजूनं निकाल दिला होता. या पूर्वीच्या निकालामुळं ओडिशातील अलीकडचा निकालही शक्य झाला. गुजरातमध्ये मृत्युमुखी पडलेले कामगार मध्यप्रदेशातील अलीराजपूर, झाबुआ आणि धर या आदिवासी गावांमधील होते. सिलिकॉसिसची लक्षणं ओळखू येत नाहीत. शिवाय धुळीच्या कणांना वास नसतो. त्यामुळं आपण श्वासावाटे आत घेत असलेले घटक अखेरीस आपला जीव घेणार आहेत, हे आपल्याला लक्षातही येत नाही. गुजरातमधील प्रकरणावेळीही एका बिगरसरकारी संस्थेनं हस्तक्षेप करून सर्वोच्च न्यायालयापर्यंत खटला लढवला होता. सर्वोच्च न्यायालयाचा यासंबंधीचा निकाल कठोर आणि निःसंदिग्ध स्वरूपाचा होता. मृत्युमुखी पडलेल्या २३८ कामगारांच्या निकटवर्तीयांना ७.१४ कोटी रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, असे आदेश न्यायालयानं गुजरात सरकारला दिले. तर, आजाराला तोंड देऊन जगलेल्या परंतु अजूनही आजारी असलेल्या ३०४ कामगारांचं पुनर्वसन करण्याचे आदेश मध्यप्रदेश सरकारला देण्यात आले.

गुजरात व ओडिशा या दोन्ही ठिकाणच्या प्रकरणांमध्ये कामगार अल्पकालीन कंत्राटी रोजगारावर काम करत होते, त्यामुळं कायद्यानुसार कामगारांना मिळणाऱ्या हक्काच्या लाभांपासून त्यांना वंचित राहावं लागत होतं. यातील अनेक कामगार स्थलांतरित मजूर आहेत. बहुतेकदा ते शेजारी राज्यामधील दारिद्र्यग्रस्त प्रदेशांतून आलेले असतात. प्राणघातक धुळीनं भरलेल्या वातावरणात हे लोक काम करत होते परंतु त्यांच्या कारखान्यांकडून त्यांना संरक्षणात्मक साधनसामग्री पुरवली गेली नव्हती. त्यांना श्वसनाला त्रास होऊ लागल्यावर त्यांना कोणतीही वैद्यकीय मदत उपलब्ध झाली नाही. त्यांच्या आरोग्याची देखभाल करणारी कोणतीही व्यवस्थाच अस्तित्वात नसल्यामुळं त्यांची ढासळलेली तब्येत थेट त्यांच्या कामाच्या ठिकाणाशी संबंधित आहे हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा नव्हता. अखेरीस त्यांना काम करणंच अशक्य झाल्यावर ते त्यांच्या गरीब आदिवासी गावांमध्ये परतले आणि धीम्या गतीनं यातनादायी मृत्यूला सामोरे गेले.

'कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८' आणि 'कामगार भरपाई अधिननियम १९२३' यांमध्ये व्यवसायांशी संबंधित विविध आजारांची नोंद करण्यात आली आहे, त्यात सिलिकॉसिसचा समावेश आहे. परंतु, सदर दोन अधिनियम किंवा 'कारखाने अधिनियम, १९४८' आणि 'खाणी अधिनियम, १९५२' यांसारखे इतर कायदे केवळ औपचारिक संघटित क्षेत्रातील कामगारांनाच लाभ पुरवतात. वास्तविक अशा आजारांची लागण होणारे बहुसंख्य लोक औपचारिक क्षेत्रात काम करतात, तिथं त्यांना चांगल्या वेतनासाठी किंवा सुरक्षित कामाच्या परिस्थितीसाठी वाटाघाटी

**हार्दिक निमंत्रण!**

पाक्षिक परिवर्तनाचा वाटसरूच्या १६ ऑगस्ट २०१७ आणि १ सप्टेंबर २०१७ या 'स्वातंत्र्य विमुक्तांचे' - भाग १ व २ अशा दोन्ही अंकांचा एकत्रित प्रकाशन समारंभ भटके विमुक्त स्वातंत्र्य दिन - दि. ३१ ऑगस्ट २०१७ रोजी संध्याकाळी ६.०० वा. पत्रकार भवन, गांजवे चौकाजवळ, नवी पेठ, पुणे येथे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते होईल. आपण या कार्यक्रमास अवश्य उपस्थित राहावे, ही विनंती.

**संपादक व अतिथी संपादक**

करता येत नाहीत. सिलिकॉसिससारखे आजार अनेकदा क्षयरोगाशी संबंधित असल्याची गैरसमजूत करून घेतली जाते, आणि क्षयरोगावर उपचार करता येतो. एखादा कामगार सिलिकॉसिसनं मरण पावला तरी त्याच्या मृत्यूला हा आजार कारणीभूत असल्याचं सिद्ध करणं जवळपास अशक्य असतं. त्यामुळं सिलिकॉसिसमुळं होणारे मृत्यू आणि कोळसा खाणकामगारांना होणारा 'काळ्या फुफ्फुसा'चा न्यूमोकोनिओसिस हा आजार, किंवा कारखाने अधिनियमामध्ये प्राणघातक म्हणून नोंदवलेला अस्बेस्टोसिस किंवा कापसाच्या धुळीमुळं कापडोद्योगातील कामगारांना होणारा बायसिनोसिस या आजारांमुळं होणारे मृत्यू यांची आकडेवारी अतिशय कमी नोंदवली जाते.

विशिष्ट व्यवसायांशी संबंधित हे आजार केवळ भारतातच आहेत, असं नाही. उदाहरणार्थ, युनायटेड किंगडमसारख्या देशांमध्ये सिलिकॉसिस व न्यूमोकोनिओसिस यांसारख्या व्यवसायाधिष्ठित आजारांचा सामना करण्यासाठी विशिष्ट पावलं उचलण्यात आली आहेत. ज्या उद्योगांमध्ये कामगारांचा प्राणघातक पदार्थांशी संबंध येतो अशा ठिकाणी सुरक्षाविषयक उपायांची अंमलबजावणी बंधनकारक करण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक कामगाराला सुरक्षाविषयक साधनसामग्री पुरवणं, एवढाच उपाय नसतो, तर धुळीचं प्रमाण कमी व्हावं यासाठी उत्पादनाच्या निराळ्या पद्धतीही वापरल्या जातात. या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या सर्व कामगारांची नियमितपणे आरोग्य तपासणी करावी आणि त्यांच्या तब्येतींची देखभालही केली जावी, असं तिथल्या कायद्यात म्हटलं आहे. सिलिकॉसिससारखा आजार दीर्घकाळ जम बसवत असतो आणि संबंधित व्यक्तीच्या आरोग्यविषयक तपासणीतूनच तो ओळखता येऊ शकतो. शिवाय, हा आजार बरा होत नसल्यामुळं प्राणघातक घटकांचा प्रादुर्भाव कमी करणं एवढाच या रोगाला प्रतिबंध करण्याचा मार्ग आहे.

केवळ अतिशय गरीबांच्याच समोर उभं ठाकणारं हे आरोग्यविषयक संकट आहे, त्याकडं राज्य सरकारांनी लक्ष द्यावं यासाठीची कृतिशीलता ओडिशातील निकालानं आणि त्याआधीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानं दाखवली. भोपाळमध्ये १९८४ साली झालेल्या वायुगळतीनंतर १९८७मध्ये कारखाने अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या. आता या कायद्यामध्ये घातक प्रक्रियांची दखल घेण्यात आली आहे आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या व्यवसायाधिष्ठित आरोग्यसुविधांचीही स्पष्ट नोंद करण्यात आली आहे. दुर्दैवानं भारतातील दुर्बलांच्या कल्याणाविषयीच्या इतर योजनांप्रमाणेच या तरतुदीही केवळ कागदावर राहातात आणि क्वचितच त्यांची अंमलबजावणी होते. या पार्श्वभूमीवर, खाणींमध्ये आणि कारखान्यांमध्ये काम करणारे बहुसंख्य कामगार त्यांच्या अस्तित्वालाच पुसून टाकणाऱ्या भूमिगत जगात घाम गाळत असतात. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२९ जुलै व ५ ऑगस्ट या अंकांतून)

**परिवर्तनाचा वाटसरू – प्रतिनिधी**

**अकोला शहर –** प्रा. अशोक इंगळे, भ्र. ९४२१७४७४१७

**अकोला जिल्हा –** प्रा. संतोष कायंदे, भ्र. ९४२१७४८७८२

**नांदेड शहर –** प्रा. राजेंद्र गोणारकर, भ्र. ९८९०६१९२७४

**नांदेड जिल्हा –** प्रा. राजेंद्र इंगळे, भ्र. ९४२३३०५८२७

**परभणी –** बाळू बुधवंत, भ्र. ९४२१८६०८०७, ९९२२२९८४८८

**सातारा –** नितीन साळुंखे, भ्र. ९९७५६७०६१२

**सोलापूर –** रवींद्र मोकाशी, भ्र. ९४२२६४५०५५

**वाशिम –** शेषराव पिराजी धांडे, भ्र. ९९२३४८९६९७